जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वरुड | शुक्रवार

०३.०४.२०२६

वर्ष: ०७ | अंक: ६२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

### थोडक्यात

## घारापुरी बेटावर प्रगत जलव्यवस्थापनाचा उलगडा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - जागतिक वारसा स्थळ असलेल्या घारापुरी (एलिफंटा) बेटावर सुरू असलेल्या पुरातत्त्व विभागाच्या उत्खननातून अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे.


बेटावर सुमारे १५०० वर्षांपूर्वीचे, दगड आणि विटांनी बांधलेले एक भव्य 'टी' आकाराचे जलकुंड सापडले असून, यामुळे प्राचीन काळातील प्रगत अभियांत्रिकी आणि जलव्यवस्थापन प्रणालीवर प्रकाश पडला आहे.

हे कुंड बेटावरील रहिवाशांना वर्षभर पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. घारापुरी बेट हे प्रामुख्याने पाषाणात कोरलेल्या लेण्यांसाठी जगप्रसिद्ध आहे.

# जन विश्वास विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर

## वाहतूक कोंडी, ड्रायव्हिंग लायसन्सच्या नूतनीकरणात होणारा विलंब हे आता गुन्हे नाहीत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** - संसदेच्या दोन्ही सभागृहांनी जन विश्वास विधेयकाला मंजुरी दिली. राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली की अधिसूचना काढली जाईल आणि विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल. हे झाले की वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरणे, जन्म आणि मृत्यूची नोंद करण्यात चुका करणे हे गुन्हे ठरणार नाही.

देशात जन विश्वास हा कायदा लागू झाला की होणाऱ्या बदलाचा लोकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम होईल. आता, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) मुदत संपल्यानंतर ३० दिवसांपर्यंत वैध राहील, म्हणजेच किरकोळ विलंबामुळे तुमच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होणार नाही. राष्ट्रीय महामार्ग अडवण्यासारख्या प्रकरणां मधील तुरुंगवासाची शिक्षा रद्द करण्यात आली असून, आता केवळ दंडाची तरतूद आहे. त्याचप्रमाणे, आगीच्या धोक्याची खोटी सूचना देणे, जन्म आणि मृत्यूची नोंद करण्यास विलंब करणे किंवा विद्युत नियमांचे उल्लंघन करणे यांसारख्या प्रकरणांमधील तुरुंगवासाची शिक्षा देखील काढून टाकण्यात आली आहे. पूर्वी सौंदर्यप्रसाधनांच्या नियमांचे उल्लंघन केल्यास तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकत होती, पण आता केवळ दंड आकारला जाईल. याचा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला फायदा होईल.

विश्वासावर आधारीत प्रशासकीय आराखड्याला चालना देणे आणि नियमनांमध्ये प्रमाणबद्धता असेल याची सुनिश्चिती करण्याबद्दलची केंद्र सरकारची वचनबद्धता यातून दिसून येते. किरकोळ गुन्ह्यांना गुन्हे सूचीतून वगळून तसेच विद्यमान कायदेशीर तरतुदींमध्ये तर्कसंगतता साधत, व्यक्ती तसेच उद्योग व्यवसायांवरील अनुपालनाचा ताण कमी करणे हा या विधेयकाचा उद्देश आहे. व्यवसाय सुलभतेला चालना देण्यासाठी यांपैकी ७१७ तरतुदींना गुन्हे या वर्गातून वगळण्यात आले आहे. जीवन सुलभतेसाठी ६७ तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या निमित्ताने केंद्र सरकारचा भर शिक्षेऐवजी सुधारणेकडे असल्याचे दिसून येत आहे. जन विश्वास विधेयकाचे राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने कायद्यात रुपांतर झाल्यानंतर सामान्य माणसाला दिलासा मिळेल आणि न्यायव्यवस्थेवरील अनावश्यक ताण कमी होईल.

# अवैध सावकारीच्या तगाद्यामुळे शेतकऱ्याला किडनी विकायला लावली

## आता न्यायासाठी बळीराजाची सरकारकडे इच्छा मरणाच्या परवानगीची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**मुंबई** - चंद्रपूर जिल्ह्याच्या मिंथूर येथील रोशन कुडे यांनी सावकाराच्या जाचामुळे आपली किडनी कंबोडिया येथे विकल्याचे धक्कादायक प्रकरण चंद्रपूर जिल्ह्यात उघडकीस आले होते.

त्यानंतर आता रोशन कुडे यांनी सावकाराच्या जाचाला कंटाळून किडनी विकणारे नागभीड तालुक्यातील शेतकरी कुडे यांनी सरकारकडे चक्क इच्छामरणाची परवानगी मागितली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी अवैध सावकारांची संपत्ती गोठवण्याचे आदेश दिले होते, मात्र दीड महिना उलटूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, असा आरोप रोशन कुडे यांनी केलाय. त्यांच्या या मागणीने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले, दीड महिना उलटूनही कोणतीही ठोस कारवाई नाही देशाच्या न्यायव्यवस्थेत अत्यंत संवेदनशील आणि ऐतिहासिक ठरणारा निर्णय नुकताच सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

१३ वर्षांपासून कोमात असलेल्या ३२ वर्षीय हरीश राणा यांना 'निष्क्रिय इच्छामरण' देण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. त्यानंतर या घटनेचे देशभरात पडसाद उमटले आहे. अशातच आता अवैध सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात अडकून स्वतःची किडनी विकण्याची वेळ आलेल्या रोशन कुडे या शेतकऱ्यानेही अशीच मागणी केली आहे.

आजही न्यायासाठी प्रशासनाच्या दारात चकरा माराव्या लागत आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी अवैध सावकारांची संपत्ती गोठवण्याचे आदेश दिले होते, मात्र दीड महिना उलटूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, असा आरोप रोशन कुडे यांनी केलाय.

# राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू

## ✻ उच्चस्तरीय आढावा बैठकीत अहवाल सादर, अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याच्या आरोपांवर शिक्कामोर्तब झाले आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मोटार परिवहन विभाग व एसटी महामंडळाची उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत सादर करण्यात आलेल्या १ महिन्याच्या अहवालानुसार, राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. याची दखल घेत परिवहन मंत्र्यांनी संयुक्त कारवाईचा



अहवाल सादर करणे बंधनकारक केले असून जबाबदारी टाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

राज्यातील वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मोटार परिवहन विभाग व एसटी महामंडळाची उच्चस्तरीय आढावा बैठक गुरुवारी पार पडली. या बैठकीत राज्यातील सद्यस्थितीबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली असून, तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले. या बैठकीत सादर करण्यात आलेल्या १ महिन्याच्या अहवालानुसार राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असून, अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याची नोंद करण्यात आली आहे.

त्यामागील प्रमुख कारणे म्हणजे स्थानिक स्तरावर आदेशांची प्रभावी अंमलबजावणी न होणे, तसेच एसटी व आरटीओ विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# मुस्लिम आरक्षण रद्द करण्याच्या निर्णयाला आव्हान

## राज्य सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे हायकोर्टाचे आदेश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात मुस्लिमांना दिलेले पाच टक्के आरक्षण रद्द करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेची उच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. न्यायमूर्ती रियाज छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला तीन आठवड्यांत भूमिका स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देत, याचिकेची सुनावणी ४ मे रोजी निश्चित केली.



राज्य सरकारच्या नव्या शासन निर्णयानुसार विशेष मागासवर्गीय श्रेणी (अ) अंतर्गत समाविष्ट असलेल्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास मुस्लिम गटासाठी सरकारी, निमसरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये पाच टक्के आरक्षण देण्याशी संबंधित मागील सर्व निर्णय आणि अध्यादेश रद्द केले.

तसेच २०१४ पासूनचे पूर्वीचे निर्णय आणि परिपत्रके रद्द करून विशेष मागासवर्गीय श्रेणीतील मुस्लिमांना जात आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्रे देणे बंद केले. याला आक्षेप घेत ॲड.सय्यद एजाज अब्बास नक्वी यांनी ॲड.नितीन सातपुते यांच्यामार्फत याचिका दाखल केली आहे. याचिका कर्त्यांच्या वतीने ॲड.एजाझ नक्वी यांनी सरकारच्या निर्णयावर जोरदार आक्षेप घेतला. सरकारचा हा निर्णय संविधानाचे उल्लंघन करणारा आणि मुस्लिम समुदायाच्या हिताच्या विरोधात आहे. तसेच मुस्लिमांना सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात दिलेले पाच टक्के आरक्षण उच्च न्यायालयाने २०१४ मध्ये कायम ठेवले होते. या निकालाला कुणाकडूनही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलेले नाही, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले.

# आसामचे मुख्यमंत्री सर्वाधिक भ्रष्ट : राहुल गांधी

## मोदी, शहा, सरमा यांचे आसाममध्ये लँड एटीएम, काँग्रेसची टीका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बोकाजन** :- काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले.



सरमा हे भारतातील 'सर्वात भ्रष्ट मुख्यमंत्री' असल्याचा आरोप करत, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री सरमा हे तिघे मिळून आसाममध्ये 'लँड एटीएम' चालवत असल्याचा खळबळजनक दावा राहुल गांधींनी केला. सर्वसामान्यांच्या जमिनी हिसकावून त्या बड्या कॉर्पोरेट घराण्यांना दिल्या जात असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. बोकाजन मतदारसंघातील काँग्रेस उमेदवार रतन एंगती यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते बोलत होते.

'लँड एटीएम'द्वारे जमिनींची लूट राहुल गांधी यांनी दावा केला की, आसाममधील जवळपास ६१ हजार एकर जमीन तीन मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्यात आली आहे.

नरेंद्र मोदी, अमित शहा आणि हिमंत बिस्वा सरमा यांनी आसामला जमिनीचे एटीएम बनवले आहे. जनतेकडून जमीन हिसकावून ती उद्योगपतींना वाटली जात आहे, असे ते म्हणाले. भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे सरमा हे पूर्णपणे मोदींच्या नियंत्रणाखाली असून ते सिंडिकेटद्वारे राज्य चालवत असल्याचेही त्यांनी नमूद केले.



# बेहिशेबी मालमत्तेप्रकरणी पती-पत्नीवर गुन्हा

**सिडकोच्या अधिकाऱ्याचा प्रताप : एसीबीच्या चौकशीत उघड**

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**नवी मुंबई :-** सिडकोतील बोगस कर्मचारी वेतन घोटाळ्यातील मुख्य आरोपी सागर मदनलालजी तपाडिया याने आपल्या पदाचा गैरवापर करुन पत्नीच्या नावावर कोट्यवधी रुपयांची अवैध मालमत्ता जमा केल्याचे लाच लुचपत प्रतिबंधक ब्युरोने केलेल्या तपासात उघड झाले आहे. याप्रकरणी नवी मुंबई एसीबीने तपाडिया आणि त्याची पत्नी मनिषा तपाडिया या दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात अपसंपदा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

सिडकोत वर्ग-१ चा अधिकारी असलेल्या सागर तपाडिया हा सन २०१९ मध्ये पनवेल येथील सिडको नोडल कार्यालयात सहायक वसाहत अधिकारी पदावर कार्यरत होता. त्यावेळी त्याला लाच घेतल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. त्यावेळी त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर सन २०२१ मध्ये सागर तपाडीया हा सहायक कार्मिक अधिकारी म्हणुन रुजू झाल्यानंतर २०२३ मध्ये त्याने सिडकोच्या सेवेत २९ बोगस कर्मचारी कार्यरत असल्याचे दाखवून त्यांच्या नावे सुमारे ३ कोटी रुपयांची रक्कम परस्पर हडप केली होती.

# मिठी नदी गाळ उपसा करण्यात विलंब; किशोरी पेडणेकरांचा हल्लाबोल

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई -** मिठी नदीतील गाळ उपसा करण्याचे कंत्राट उशिराने देण्यात आले आहे. पुढील दोन महिन्यांत वरुणराजाचे आगमन होण्याची शक्यता असताना मिठी नदीची सफाई करण्यात नियोजनाचा अभाव दिसून येत आहे, असा हल्लाबोल पालिकेतील विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी गुरुवारी केला.



पेडणेकर यांनी गुरुवारी मिठी नदीतील गाळ उपसा करण्याच्या कामाची पाहणी केली, त्यावेळी त्या बोलत होत्या. 'गाळ सफाईसाठी तीन कंत्राटदार नेमले असले तरी एका कंत्राटदारालाच दोन कंत्राटे देण्यात आली आहेत. म्हणजे प्रत्यक्षात दोनच कंत्राटदार काम करत आहेत,' असा आरोप त्यांनी केला. तसेच काम उशिरा सुरू झाल्यामुळे १२ दिवसांचा गॅप कसा भरून काढणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

गाळ सुकण्यासाठी किमान ४८ तासांचा अवधी लागतो, मात्र अवकाळी पावसामुळे कामात आणखी अडथळे निर्माण होऊ शकतात. कंत्राटदारांनी काम वेळेत पूर्ण केले नाही, तर आम्ही गप्प बसणार नाही. मुंबईकर सगळं पाहत आहेत, असा इशाराही त्यांनी दिला.

# निवडणूक रद्द करण्याचा भाजपचा डाव - ममता बॅनर्जी

**बंगालमध्ये सरकारी अधिकाऱ्यांना घेराव, 'तृणमूल'च्या मदतनीस कंपनीवर पुन्हा छापे**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**सागरदिघी (पश्चिम बंगाल) -** पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यात मतदारयादीच्या विशेष सखोल परीक्षण प्रक्रियेत गुंतलेल्या सात न्यायिक अधिकाऱ्यांना जमावाने ओलीस ठेवल्याच्या घटनेनंतर राजकारण तापले आहे. याच दरम्यान तृणमूल काँग्रेसला राजकीय सल्ला देण्यासाठी मदत करणाऱ्या एपीएसी या कंपनीवर इडीच्या अधिकाऱ्यांनी पुन्हा एकवार छापे घातल्याने नव्या वादाला सुरुवात झाली आहे.



मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी या घटनेसाठी निवडणूक आयोगाला जबाबदार धरले असून, न्यायिक अधिकाऱ्यांचे संरक्षण करण्यात आयोग अपयशी ठरल्याचा आरोप केला आहे. तसेच, राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावरील बदल्यांवरून त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

बुधवारी मालदा जिल्ह्यात मतदार यादीतून नावे वगळल्याच्या रागातून आंदोलकांनी सात न्यायिक अधिकाऱ्यांना कित्येक तास घेराव घातला होता. अखेर सुरक्षा दलांनी मध्यस्थी करून या अधिकाऱ्यांची सुटका केली. या घटनेची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेत कडक ताशेरे ओढले आहेत. या संदर्भात ममता यांनी मुर्शिदाबाद जिल्ह्यातील एका निवडणूक सभेत बोलताना भाष्य केले. त्या म्हणाल्या, 'निवडणूक जाहीर झाल्यापासून निवडणूक आयोगाने पोलीस आणि नागरी प्रशासनावर स्वतःचे नियंत्रण ठेवले आहे. जर कायदा व सुव्यवस्था राखण्यात अपयश येत असेल, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आयोगाचीच आहे.

# गॅस तुटवड्याने बेस्टची उपाहारगृहे बंद : कामगारांवर उपासमारीची वेळ

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई :-** इस्रायल-अमेरिका आणि मध्य पूर्वेतील इराण यांच्यात गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या युद्धाचे परिणाम आता जगभर जाणवू लागले आहेत. भारताची आर्थिक राजधानी मुंबईलाही या युद्धाची झळ कधीपासूनच बसली आहे. आता एलपीजीच्या गॅस तुटवड्यामुळे बेस्ट उपक्रमातील उपाहारगृह हळू-हळू बंद होत आहेत. यामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून वेळीच याबाबत उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी दि बीईएसटी वर्कर्स युनियनने बेस्ट उपक्रमाच्या



महाव्यवस्थापकांकडे केली आहे.

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर इंधन पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. याचे पडसाद स्थानिक पातळीवरही उमटत असून, व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरच्या उपलब्धतेवर मर्यादा आल्या आहेत. तसेच त्यावर तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. या गंभीर परिस्थितीचा थेट फटका बेस्ट उपक्रमाच्या विविध आगार आणि कार्यालयांतर्गत चालवल्या जाणाऱ्या उपाहारगृहांना बसत असून कामगारांची उपासमार होत असल्याचे युनियनचे सरचिटणीस शशांक राव यांनी म्हटले आहे.

बेस्टचे चालक, वाहक आणि कार्यशाळा कर्मचारी तसेच हजारो कर्मचारी अहोरात्र मुंबईची सेवा बजावत असतात. या कर्मचाऱ्यांना सकस आणि वेळेवर आहार मिळण्यासाठी ही उपाहारगृहे हा मुख्य आधार आहेत. गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे अनेक उपाहारगृहे बंद होण्याच्या मार्गावर आहेत. जर ही उपाहारगृहे बंद झाली, तर कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर आणि पर्यायाने उपक्रमाच्या कार्यक्षमतेवर होऊ शकतो, शशांक राव यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रवादीतील वाद! पडदा टाकण्याचा पार्थ यांचा प्रयत्न : तर पटेलांबाबत सुनेत्रा यांची 'गुगली'

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई -** राष्ट्रवादी काँग्रेसमधील कथित वादंगावर पडदा टाकण्याचे प्रयत्न खासदार पार्थ पवार यांनी सुरू केल्याचे दिसते.





खासदार प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याबद्दलच्या येणाऱ्या बातम्या निराधार आणि तर्कवितर्क हे निव्वळ काल्पनिक आहेत, असा खुलासा पार्थ पवार यांनी गुरुवारी केला. पटेल आणि तटकरे यांची दशकांहून अधिक काळाची निष्ठा आणि नेतृत्व आपल्या सर्वांना नेहमीच दिशा देत आले आहे. अशा ज्येष्ठ नेत्यांना मुद्दामहून ओढूनताणून निर्माण केलेल्या वादात गोवणे हे अत्यंत दुर्दैवी असल्याचेही पवार यांनी म्हटले आहे.

निराधार बातम्या आणि केवळ तर्क-वितर्कांवर आधारित कथनाद्वारे पटेल आणि तटकरे यांना लक्ष्य केले जात आहे. त्यांचे अनेक दशकांचे योगदान आणि नेतृत्व आजही आम्हा सर्वांना मार्गदर्शन करत आहे. अशा वरिष्ठ नेत्यांना वादांमध्ये ओढणे अत्यंत दुर्दैवी असून याचा ठामपणे निषेध केला पाहिजे, असे पार्थ पवार यांनी म्हटले आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी भारत निवडणूक आयोगाला दिलेल्या पत्रात प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या नावासमोर त्यांच्या पदाचा उल्लेख नाही. हा तपशील खरा की खोटा याबाबत मात्र पार्थ यांनी स्पष्ट खुलासा केलेला नाही.

दरम्यान, पार्थ यांचा हा खुलासा येत असतानाच तिकडे दिल्लीत एक छोटे नाट्य घडले. एरवी राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते दिल्लीत आले की प्रफुल्ल पटेल हमखास त्यांच्यासोबत असतात. गुरुवारी राज्यसभा अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी उपस्थित राहण्यासाठी खासदार असलेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार दिल्लीत आल्या होत्या. मात्र त्यांच्यासोबत पटेल नव्हते.

त्यावेळी पत्रकारांनी प्रफुल पटेल कुठे आहेत अशी प्रतिक्रिया दिली. सध्या राष्ट्रवादीत चालू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर या उत्तराचे वेगवेगळे अर्थ लावले जाऊ लागले. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सर्वप्रथम या वादाला तोंड फोडले होते.

# बारामती आणि राहुरीच्या रिंगणात काँग्रेसची एन्ट्री!

**पोटनिवडणूक लढवण्यास पक्षश्रेष्ठींचा हिरवा कंदील, मित्रपक्षांसोबत चर्चेनंतर नावांची घोषणा**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**पुणे :-** राज्यातील बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने महत्त्वाचा निर्णय घेत दोन्ही मतदारसंघात निवडणूक लढवण्याचा निर्धार केला आहे. पक्षश्रेष्ठींकडून यासाठी हिरवा कंदील मिळाल्याची माहिती समोर आली आहे.



दोन्ही मतदारसंघात मित्रपक्षांशी चर्चा करूनच उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी काल संभाव्य उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या असून, स्थानिक पातळीवरील समीकरणांचा आढावा घेण्यात आला. इच्छुकांची संख्या लक्षात घेता पक्ष नेतृत्व योग्य उमेदवार निवडण्यासाठी काळजीपूर्वक निर्णय घेणार असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवार निश्चितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, लवकरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. दोन्ही मतदारसंघात मित्रपक्षांशी चर्चा करूनच उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात येणार असल्याची माहिती काँग्रेस सूत्रांकडून मिळाली आहे.या निर्णयामुळे बारामती आणि राहुरीतील राजकीय लढती अधिक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत असून, महाविकास आघाडीत जागावाटप आणि रणनीतीबाबतही पुढील घडामोडींना वेग येणार आहे.

आमच्या पक्ष श्रेष्ठीसोबत बोलणं झालं काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील याबाबत काल माध्यमांशी बोलताना सांगितलं की, राहुरी आणि बारामती विधानसभेबाबत आमच्या पक्ष श्रेष्ठीसोबत बोलणं झालं आहे.

यासाठी आमच्याकडे उमेदवारी मागणारे अर्ज आले आहेत. बारामतीसाठी ६ अर्ज आले आहेत आणि राहुरीमधे ४ अर्ज आले आहेत. येत्या २ दिवसांत आम्ही निवडणूक लढण्याबाबत भूमिका जाहीर करू. आज ऑनलाईन मुलाखती देखील झाल्या आहेत, अशी माहिती त्यांनी काल दिली होती. तर आज समोर आलेल्या माहितीनुसार, राज्यातील बारामती आणि राहुरी पोट निवडणुकीसाठी काँग्रेस पक्ष उमेदवार देणार आहेत.

# पाणीपट्टी वसुलीत उर्ध्व वर्धा प्रकल्प अव्वल

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**अमरावती -** पश्चिम विदर्भातील उर्ध्व वर्धा प्रकल्प सर्वात मोठा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची निर्मिति सिंचन क्षमता ही ८५,००२ हेक्टर, तर जलसाठा ५६४.०५ दलघमी आहे. या प्रकल्पातून अमरावती व वर्धा तालुक्यामध्ये कालव्याद्वारे सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येते. या प्रकल्पाचे पाणीपट्टी वसुलीत अव्वल स्थान पटकाविले आहे.



सन २०२५-२६ या वर्षा करीता सिंचनासाठी २.१६४ कोटी रुपये वसुली करण्याचे उद्?ष्टि विभागाला देण्यात आले होते. सन २०१६ मध्ये उर्ध्व वर्धा प्रकल्प विभागाचे रुपांतरण सिंचन पाटबंधारे विभागामध्ये करण्यात आले. कामाचे नियोजन व सातत्याने करण्यात आलेल्या पाठपुराव्यामुळे थकित लाभधारकांना पाणीपट्टी भरण्यासाठी केलेल्या आवाहनामुळे या विभागाने सुमारे ०.७६ कोटी रुपये वसुली केली आहे.

तसेच या प्रकल्पामधून बिगर सिंचनासाठी पाणी उचल करणाऱ्या सर्व यंत्रणांना मार्च २०२६ पूर्वी थकबाकीचा भरणा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. बिगर सिंचनासाठी ४० कोटी उद्?ष्टिांपैकी ५०.७५ कोटी रुपयांचा विक्रमी वसुली झाल्याची माहिती कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत यांनी दिली. सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी मिळून सुमारे ५१.५१ कोटी रुपये सर्वाधिक वसुलीच्या विक्रमाची नोंद करण्यात आली आहे. इतिहासामध्ये प्रथमच मोठ्या प्रमाणात सिंचन पाणीपट्टी वसुली झाली आहे.

उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिक्षक अभियंता मनिष राजभोज यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. यामुळे उद्दिष्टाच्या १२२.१७ टक्के उद्दिष्ट गाठले आहे. सर्व वसुलीच्या मोहीमेमध्ये बिगर सिंचन पाणीपट्टी वसुलीचे योगदान महत्वाचे आहे. या मोहीमेत सहभागी सर्व उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, कालवा निरिक्षक, मोजणीदार, दप्तर कारकुन व तसेच सर्व क्षेत्रीय तथा विभागीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.

# संपादकीय

**{सामर्थ्या शिवाय अन्यायाचा प्रतिकार करता येणार नाही.}**

## महावारसा व वर्तमानाचे वास्तव: निराशेच्या गर्तेकडून आशेच्या प्रकाशाकडे

वैभवाचा हुंकार 'मराठा टिटुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' असे सांगणाऱ्या समर्थ रामदासांपासून ते 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा मंत्र देणाऱ्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत महाराष्ट्राला एका प्रदीर्घ आणि तेजस्वी वैचारिक परंपरेचे अधिष्ठान लाभले आहे. ही भूमी केवळ भौगोलिक प्रदेश नाही, तर ती एक संस्कारपीठ आहे. महाराष्ट्राला लाभलेला क्रांतीकारक, समाजसुधारक, साहित्यिक आणि सांस्कृतिक मेरुमणींचा वारसा इतका अथांग आहे की, जगाच्या पाठीवर अशा प्रकारची वैचारिक सुबत्ता क्वचितच पाहायला मिळेल. मात्र, आज जेव्हा आपण या महान वारशाचे प्रतिबिंब वर्तमानाच्या आरशात पाहतो, तेव्हा मनात एक हुरहूर दाटून येते. या आरशात दिसणारे चित्र आपल्याला निराशेच्या गर्तेत तर नेत नाही ना? आणि जर तसे होत असेल, तर या निराशेवर मात कशी करायची, याचे आत्मचिंतन करण्याची वेळ आता आली आहे.

क्रांतीकारक आणि समाजसुधारकांचे संचित

महाराष्ट्राचा इतिहास हा संघर्षाचा इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी शून्यातून विश्व निर्माण करून 'स्वराज्य' स्थापन केले. तोच वारसा पुढे १८५७ च्या उठावापासून ते सशस्त्र क्रांतीकारकांपर्यंत वाहत राहिला. चाफेकर बंधू, सावरकर, वासुदेव बळवंत फडके यांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन या मातीचा स्वाभिमान जागा ठेवला.

दुसरीकडे, समाजसुधारणेच्या क्षेत्रात महाराष्ट्राने देशाला दिशा दिली. महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी उघडली. राजर्षी शाहू महाराजांनी आरक्षणाचे आणि समतेचे बीज रोवले. महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर यांनी बुद्धीप्रामाण्यवादाचा पुरस्कार केला. या महापुरुषांनी केवळ भाषणे दिली नाहीत, तर स्वतःच्या आयुष्याची समिधा करून समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि विषमता यांच्यावर प्रहार केले. त्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्र हे देशाचे 'पुरोगामी राज्य' म्हणून ओळखले जाऊ लागले. साहित्य आणि संस्कृतीचे मेरुमणी साहित्याच्या बाबतीत ज्ञानेश्वर-तुकारामांच्या पालखीपासून ते कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, आणि वि.स. खांडेकर यांच्या लेखणीपर्यंत महाराष्ट्राने एक समृद्ध सांस्कृतिक विश्व जोपासले आहे. मराठी भाषेने केवळ शब्द दिले नाहीत, तर जगण्याचे तत्त्वज्ञान दिले. इथली लोकसंस्कृती, लावणी, पोवाडा आणि कीर्तन यांमधून सामान्य माणसाला नैतिकतेची जोड मिळाली. ही सांस्कृतिक संपन्नता आपला सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. वर्तमानाचा आरसा आणि निराशेची सावली जेव्हा आपण या गौरवशाली इतिहासाकडून आजच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीकडे वळतो, तेव्हा आरशात दिसणारे प्रतिबिंब काहीसे विस्कळीत वाटते. आजच्या राजकीय पटलावर तत्त्वांपेक्षा तडजोडींना, विचारांपेक्षा आकड्यांना आणि जनहितापेक्षा सत्तेला प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र दिसते.

# नियमांच्या जंजाळात शैक्षणिक क्षेत्र!

शाळा प्रवेशाच्या संदर्भात नियम करताना त्याचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांचा समावेश वाढवण्याचा असला पाहिजे, विद्यार्थ्यांना वगळण्यासाठी नियम केले जाऊ नयेत; पण एक कि.मी. अंतराच्या नियमामुळे मोठ्या प्रमाणात विद्यार्थी कायद्यातील या योजनेच्या लाभाला मुकणार आहेत.

नेमेची येतो मग पावसाळा'सारखे जानेवारी-फेब्रुवारी महिना आला की काही ना काही कारणामुळे शिक्षण हक्क कायदा व त्यातील सामाजिक, आर्थिक, वंचित घटकांसाठी असणारे २५ टक्के आरक्षणाचे प्रवेश हा वादाचा मुद्दा गेली दहा-बारा वर्षे सतत होत आहे. असे होण्याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षण धोरणातील अंतर्गत विसंगती हे आहे.

एका बाजूला शिक्षणाचे खासगीकरण करणे, विनाअनुदानित खासगी शिक्षणाला मुक्त स्वातंत्र्य देणे, शासनाने जनतेला शिक्षण देण्याची आपली जबाबदारी शिक्षण सम्राटांवर सोपवणे, तर दुसऱ्या बाजूला शिक्षण धोरणातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करणे व किमान याचा आभास निर्माण करणे, त्यासाठी अनेक त्रुटीने परिपूर्ण असलेला 'बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायदा २००९?'ची अंमलबजावणी करण्याचा खटाटोप करणे हे धडपड दरवर्षी महाराष्ट्रात शिक्षण खात्याला करावी लागत आहे व ही तारेवरची कसरत ठरत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणात जातीवर आधारित भेदभाव नष्ट करण्यासाठी व समता संवर्धनासाठी 'प्रमोशन ऑफ इक्विटी इन हायर एज्युकेशन इन्स्टिट्यूशन रेग्युलेशन २०२६' हे विधेयक १३ जानेवारी २०१६ रोजी मंजूर केले होते. त्याला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली; पण जातीवर आधारित भेदभाव हा केवळ उच्च शिक्षणात होत नाही तर तो शालेय शिक्षणातही होत असतो. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्र शासनाने २५ टक्के मुलांच्या प्रवेशासाठी लागू केलेली एक कि.मी.ची अट हे आहे. 'शिक्षण हक्क कायदा २००९?' हा आदर्श आहे असे अजिबात नाही; पण त्यात अशी तरतूद आहे की, प्रामुख्याने खासगी व विनाअनुदानित शाळा त्यांच्या एकूण पहिलीच्या प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागा सामाजिक मागासलेल्या घटकांसाठी म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, भटक्या व विमुक्त जातीसाठी आणि आर्थिक दुर्बल वर्गासाठी राखीव ठेवतील. या मुलांची शुल्क प्रतिपूर्ती शासन करेल व या संस्था मुलांना मोफत शिक्षण देतील. मुळातच ही 'व्हाऊचर सिस्टीम' अयोग्य आहे; पण शिक्षण चळवळीचा विरोध डावलून भारत सरकार या योजनेची अंमलबजावणी करत आहे.



वृत्तपत्रातील बातम्यांनुसार महाराष्ट्र शासनाकडून शिक्षण संस्थांना शुल्क प्रतिपूर्तीची थकीत रक्कम सुमारे रु. २५०० कोटी आहे. शुल्क प्रतिपूर्तीचा हा बोजा शासनाला डोकेदुखी होत आहे व ही जबाबदारी टाळण्यासाठी अलीकडे शासन निरनिराळ्या युक्त्या शोधत असते. उदा. २०२४ मध्ये शिक्षण हक्क कायद्यातील कलमांचा चुकीचा अर्थ लावून २५ टक्क्यांचे प्रवेश केवळ सरकारी शाळेत दिले जातील असा नियम शासनाने केला; पण हा कायद्याचा चुकीचा अर्थ आहे. म्हणून अ.भा. समाजवादी अध्यापक सभा व इतर संघटना, पालकांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात गेल्या. न्यायालयाने पालकांची बाजू ग्राह्य मानली व शासनाचा आदेश रद्द केला.

आता २०२६-२७ साठी शासनाने नियम केला की, २५ टक्के आरक्षणाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या घराच्या एक कि.मी. परिसरातील शाळेतच प्रवेश मिळेल व विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरताना दहा शाळांचे पर्याय दिले पाहिजेत. हा शासन निर्णय १२ फेब्रुवारी २०२० रोजी जाहीर झाला व १७ फेब्रुवारी २०२६ पासून शिक्षण खात्याने प्रवेश प्रक्रिया नव्या नियमाने सुरू केली. नव्या नियमाबद्दल पालकांना, जनतेला काय वाटते हे मांडायला वेळ न देता, घाईघाईने नियमाची अंमलबजावणी करणे हे मुळात लोकशाहीविरोधी आहे व ही घाई शंका निर्माण करणारी आहे.? शिक्षण हक्क कायदा २००९?'ची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून म्हणजे २०१२-१३ पासून २०२५-२६ पर्यंत पालकांना त्यांच्या घरापासून एक ते तीन कि.मी. किंवा त्यापेक्षा पुढच्या अंतराच्या शाळा त्यांच्या पसंतीनुसार निवडण्याची संधी असायची व विद्यार्थ्याला शाळा देताना अग्रक्रमाने प्रथम एक, नंतर दोन, नंतर तीन व नंतर त्या पुढच्या कि.मी.च्या शाळा दिल्या जायच्या आणि या पद्धतीबद्दल कोणाची तक्रार नव्हती! या नियमाचा फायदा असा होता की पालकांना शाळा निवडीला जास्त पर्याय उपलब्ध होते. त्यामुळे सुमारे तीन लाखांपर्यंत प्रवेश अर्ज यायचे; परंतु या वर्षी एकूण परिस्थिती पाहता केवळ दोन लाखांपर्यंत प्रवेश अर्ज येतील, असे वाटते. नव्या नियमाचे दोन प्रमुख परिणाम होत आहेत. एक, अनेक पालकांना एक कि.मी. परिसरात एकही शाळा दिसत नाही. हा प्रश्न शहरी भाग सोडून थोडे पुढे गेले की, जास्त गंभीर होत आहे. यामुळे हजारो पालकांना प्रवेश अर्ज भरण्याची संधी मिळालेली नाही. दोन, काही भागात एक कि.मी. परिसरात शाळा दिसल्यास तर त्या एक दोनच असतात, मग दहा शाळांचे पर्याय पालकांनी द्यायचे कसे?

# मराठी भाषा आणि संस्कृती : आपला अभिमान, आपली ओळख

महाराष्ट्र ही संतांची, शूरवीरांची आणि समाजसुधारकांची भूमी आहे. या भूमीला जेवढा पराक्रमाचा इतिहास लाभला आहे, तितकीच समृद्ध परंपरा इथल्या मराठी भाषेला आणि संस्कृतीला लाभली आहे. मराठी केवळ एक भाषा नसून ती महाराष्ट्राच्या मातीचा सुगंध आणि इथल्या माणसांच्या मनाचा आरसा आहे.

मराठी भाषेचा प्रवास हा संत ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी'पासून सुरू होतो. 'माझा मराठाचि बोलु कवतुके। परि अमृतातेही पैजा जिंके।' असे म्हणत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचे गोडवे गायले. त्यानंतर संत तुकाराम, नामदेव, एकनाथ यांसारख्या अनेक संतांनी आपल्या अभंगांतून मराठी भाषेला जनसामान्यांपर्यंत पोहोचवले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात मराठीला राजभाषेचा दर्जा देऊन तिचा स्वाभिमान जपला.




आजच्या आधुनिक काळात मराठी भाषेसमोर काही आव्हाने नक्कीच आहेत. इंग्रजी आणि इतर भाषांच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी भाषेची गोडी कमी होत चालली आहे की काय, अशी भीती काही वेळा वाटते. विशेषतः तरुण पिढीमध्ये मराठी बोलण्यापेक्षा इंग्रजी बोलण्याकडे ओढा जास्त दिसून येतो. मात्र, भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती आपल्या संस्कृतीचा कणा आहे. जर भाषा टिकली, तरच आपली संस्कृती आणि आपले संस्कार टिकतील.

मराठी संस्कृती ही 'साधेपणा' आणि 'आपुलकी' यासाठी ओळखली जाते. वारकरी संप्रदाय, गणेशोत्सव, दिवाळी, दसरा यांसारखे सण आपल्याला एकत्र आणतात. पुरणपोळीचा गोडवा आणि पोवाड्याचा जोश ही मराठी मनाची वैशिष्ट्ये आहेत. ही संस्कृती जोपासणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी आपण दैनंदिन जीवनात मराठीचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे. मराठी पुस्तके वाचणे, मराठी नाटके पाहणे आणि आपल्या मुलांना मराठी भाषेची महती सांगणे आवश्यक आहे. आपण कितीही भाषा शिकलो, तरी आपली मातृभाषा ही आपल्या हृदयाच्या सर्वात जवळ असायला हवी. शेवटी, 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे केवळ गाणे नसून तो आपला सार्थ अभिमान असायला हवा.

# 'सासू-सून आणि मोबाईलचा नाद'

(स्थळ: घराचा हॉल. काकू किचनमधून हाका मारत बाहेर येतात आणि रुपाली सोफ्यावर बसून रील बघत हसत असते.)

**काकू:** अगं रुपाली, किती वेळा हाका मारल्या? गॅसवर दूध उतू गेलं, वाघाचा पंजा लागल्यासारखा ओटा झालाय आणि तू इथे मोबाईलमध्ये डोकं घालून बसलीयेस?

**रुपाली:** (हसून मोबाईल बाजूला ठेवत) अहो आई, चिडू नका ना! ते एक रील आलं होतं 'सासूने मारली हाक आणि सुनेचे उडाले धाबे', इतकं भारी होतं की हसून हसून पोट दुखलं माझं.

**काकू:** मेलं मेलं ते रील! तुमचं आयुष्य आता रीलमध्येच अडकलंय. आमची वेळ होती, तेव्हा सासूची हाक आली की आम्ही वाऱ्याच्या वेगाने किचनमध्ये धावायचो. आता तुमची हाक आली की फक्त 'नोटिफिकेशन' येतं.

**रुपाली:** आई, काळ बदललाय. आता आम्ही डिजिटल झालोय. उद्या तर मी तुम्हाला 'इंस्टाग्राम'वर अकाउंट उघडून देणार आहे. मग बघा तुमची 'पोहे बनवतानाची रेसिपी' कशी व्हायरल होते ती!




**काकू:** (डोळे मोठे करत) काय? मी आणि व्हायरल? अगं, मला साधं कुकरचं बटण नीट लावता येत नाही आणि तू मला इंटरनेटवर नेणार? नको बाई, लोक हसतील माझ्यावर.

**रुपाली:** छे हो! लोक तुम्हाला 'सुपर सासू' म्हणतील. आणि सांगा बरं, काल रात्री उशिरापर्यंत तुमच्या खोलीत 'टिक-टिक' आवाज कसला येत होता? तुम्ही गुपचूप कँडी क्रश खेळत होता ना?

**काकू:** (लाजून) गप गं! ते फक्त विरंगुळा म्हणून... तो 'बॉम्ब' फुटला की कसं बरं वाटतं मनाला. पण तुझ्यासारखं मी कामात दुर्लक्ष नाही करत.

**रुपाली:** बरं बाबा, मान्य! आता मी किचनमध्ये जाते. पण आज आपण दोघांनी मिळून एक डान्सचं रील बनवूया का? 'सासू-सून जोडी नंबर वन'!

**काकू:** (लाटणं उगारत) डान्स? अगं, माझे गुडघे आधीच 'कटकट' वाजतात, त्यात डान्स केला तर उद्या दवाखान्यात रील बनवावं लागेल. त्यापेक्षा जा आधी ते सांडलेलं दूध पुसून घे, म्हणजे माझं मन 'लाईक' करेल तुला!

**रुपाली:** (हसत) ओके साहेब! तुमची आज्ञा शिरसावंद्य!

# फील्ड मार्शल सॅम माणेकशॉ: भारतीय लष्कराचा अनभिषिक्त नायक

भारतीय लष्कराच्या इतिहासात अनेक शूरवीर होऊन गेले, पण ज्यांचे नाव आदराने आणि तितक्याच अभिमानाने घेतले जाते, ते व्यक्तिमत्व म्हणजे फील्ड मार्शल सॅम होर्मसजी फ्रामजी जमशेदजी माणेकशॉ. 'सॅम बहादूर' या नावाने लोकप्रिय असलेल्या या महान सैनिकाची कारकीर्द शौर्य, शिस्त आणि हजरजबाबीपणाचा एक अजोड नमुना आहे.

सुरुवातीचा काळ आणि लष्करी प्रवास सॅम माणेकशॉ यांचा जन्म ३ एप्रिल १९१४ रोजी अमृतसरमध्ये झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते आणि सॅम यांनाही डॉक्टर बनायचे होते. परंतु नशिबाने त्यांना लष्कराकडे ओढले. डेहराडूनच्या 'इंडियन मिलिटरी अकॅडमी'च्या (खचअ) पहिल्या बॅचचे ते विद्यार्थी होते.



दुसऱ्या महायुद्धात त्यांनी ब्रह्मदेशाच्या आघाडीवर मोठी कामगिरी बजावली. शत्रूच्या गोळ्या शरीरात लागलेल्या असतानाही त्यांनी हार मानली नाही, त्यांच्या या शौर्यासाठी त्यांना 'मिलिटरी क्रॉस' देऊन सन्मानित करण्यात आले होते. १९७१ चे युद्ध आणि ऐतिहासिक विजय माणेकशॉ यांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा सुवर्णक्षण म्हणजे १९७१ चे भारत-पाक युद्ध. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जेव्हा त्यांना युद्धाची तयारी विचारली, तेव्हा त्यांनी अत्यंत स्पष्टवक्तेपणाने योग्य वेळेची वाट पाहण्यास सांगितले. त्यांच्या अचूक रणनीतीमुळे भारताने केवळ १३ दिवसांत पाकिस्तानला गुडघे टेकण्यास भाग पाडले. ९३,००० पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय लष्करासमोर शरणागती पत्करली आणि जगाच्या नकाशावर 'बांगलादेश' या नवीन राष्ट्राचा उदय झाला.

निर्भय आणि हजरजबाबी व्यक्तिमत्व सॅम माणेकशॉ केवळ एक उत्तम रणनीतीकार नव्हते, तर ते अत्यंत धीट आणि स्पष्टवक्ते होते. राजकीय दबावापुढे न झुकता लष्कराचे हित जोपासणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्यातील विनोदबुद्धी शेवटपर्यंत टिकून होती. त्यांच्या सन्मानार्थ १९७३ मध्ये त्यांना भारतीय लष्करातील सर्वोच्च 'फील्ड मार्शल' ही पदवी प्रदान करण्यात आली. ही पदवी मिळवणारे ते पहिले भारतीय अधिकारी ठरले.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## अमेरिका लवकरच 'काम फत्ते' करणार : ट्रम्प यांचे पहिले देशाला संबोधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वॉशिंग्टन :-** अमेरिका-इस्राएल आणि इराणमधील युद्धाला महिना उलटून गेल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देशाला उद्देशून प्रथमच केलेल्या भाषणामध्ये, अमेरिकेच्या सैन्याचे 'मुख्य धोरणात्मक उद्दिष्ट पूर्ण होत आले असून' लवकरच हे सैन्य तेथील 'काम फत्ते' करेल, असे प्रतिपादन केले. बुधवारी रात्री देशाला उद्देशून केलेल्या आपल्या भाषणात त्यांनी या युद्धाचा जोरदार बचाव केला. एका मोठ्या जनसमुदायासमोर बोलताना त्यांनी अमेरिकन मोहिमेच्या यशाचा पाढा वाचला. वॉशिंग्टनची आतापर्यंतची सर्व उद्दिष्टे साध्य झाली आहेत किंवा त्याहून अधिक यश मिळाले आहे, असा दावा त्यांनी केला. मात्र, तरीही इराणला नजीकच्या काळात हल्ल्यांचा सामना करावा लागेल असे स्पष्ट करताना, येत्या दोन ते तीन आठवड्यांत आपण त्यांच्यावर अत्यंत भीषण प्रहार करणार आहोत, असे ट्रम्प म्हणाले. आम्ही त्यांना पुन्हा अश्मयुगात पाठवू, ते त्याच योग्यतेचे आहेत, असेही ते म्हणाले. ट्रम्प यांनी आपल्या भाषणात इराणच्या झालेल्या नुकसानीचा पाढा वाचला. त्यांच्या मते, इराणची नौसेना आता अस्तित्वात नाही आणि त्यांची वायुसेना पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स' या मुख्य लष्करी कमानला अमेरिकेने गंभीर इजा पोहोचवली आहे. अमेरिकेचे मुख्य लष्करी उद्दिष्ट पूर्ण झाले असून, इराणची अण्वस्त्र आणि क्षेपणास्त्र क्षमता निर्णायकपणे नष्ट करण्यात आली आहे, असे ते म्हणाले.

## निवडणूक आयोगावर भाजपचा प्रभाव नाही : गडकरी यांचा खुलासा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**नवी दिल्ली/कोलकाता -** निवडणूक आयोगावर भारतीय जनता पक्षाचा प्रभाव असल्याचा तृणमूल काँग्रेस व द्रमुकने केलेले आरोप केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी पूर्णपणे फेटाळून लावले. विरोधक जनतेची दिशाभूल करत असून भाजपचा 'निःपक्षपाती, स्वतंत्र आणि न्याय्य लोकशाहीवर' विश्वास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना गडकरी म्हणाले, हे सर्व आरोप चुकीचे आहेत. हा लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. भाजपचा लोकशाहीच्या मूल्यांवर पूर्ण विश्वास आहे.

पश्चिम बंगाल मधील सत्ताधारी टीएमसी आणि तामिळनाडूमधील द्रमुक यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सखोल मतदारयादी तपासणी मोहिमेद्वारे उपेक्षित समाजातील मते काढून टाकली जात असल्याचा दावा या पक्षांनी केला आहे. या प्रकरणावरून कोलकाता येथे राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाबाहेर टीएमसी समर्थकांनी बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. भाजपच्या निवडणूक रणनीतीबद्दल बोलताना गडकरी म्हणाले की, पक्ष केवळ विकासकामांच्या जोरावर जनतेचा विश्वास संपादन करेल. कोलकाता येथील निवडणूक कार्यालयाबाहेर एका भाजप कार्यकर्त्याकडे ४०० पेक्षा जास्त 'फॉर्म ६' सापडल्याचा दावा करण्यात आला, ज्यावरून टीएमसी आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला.

## मराठवाड्याला पावसाने झोडपले : आंब्याला फटका

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई -** मराठवाड्यात झालेल्या अवकाळी पाऊस, वादळ, जोरदार वारा आणि गारपिटीमुळे फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून विशेषतः आंबा बागांना मोठा फटका बसला आहे.

नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर यावर्षी आंबा उत्पादनात सुमारे ५० ते ६० टक्के घट होण्याची शक्यता असल्याची माहिती हिमायतबाग येथील केसर आंबा गुणवत्ता केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.संजय पाटील यांनी दिली. हिमायतबागेतील केसर आंबा गुणवत्ता केंद्रातर्फे मंगळवारी सलग दोन दिवस नुकसानग्रस्त फळबागांची पाहणी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर, शंकरपूरवाडी, ता. खुलताबाद आदी भागातील आंबा व मोसंबी बागांना भेट देण्यात आली. यावेळी नुकसानग्रस्त शेतकरी अनिल परांजपे यांनी सांगितले की, आमच्या बागेतील आंब्याचे ३० टक्के नुकसान झाले आहे. आंब्याचा मोहर साधारण एक महिना उशिराने आला. मोहराच्या काळात कडाक्याची थंडी दीर्घकाळ टिकल्याने फुलांचे फळात रूपांतर होण्याची प्रक्रिया मंदावली. त्यानंतर झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात फळगळ झाली आणि उत्पादनावर मोठा परिणाम झाला.यामध्ये काढणीच्या टप्प्यात असलेले गहू, हरभरा, आंबा, डाळिंब, भाजीपाला तसेच कांदा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्ह्याची भरारी

### १ हजाराहून अधिक प्रकरणांना मंजुरी राज्याच्या अग्रगण्य जिल्ह्यात स्थान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती -** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्ह्याने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या कामगिरीमुळे राज्याच्या प्रगती अहवालात जिल्ह्याचा ठसा उमटला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने १ हजार ५५ प्रकरणांना मंजुरी देऊन जळगाव, कोल्हापूर, नाशिक आणि सांगली यासारख्या जिल्ह्यांच्या पंगतीत स्थान मिळविले आहे.

जिल्ह्यात योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. यात एकूण ४ हजार १८४ अर्ज प्राप्त झाले.

अर्जाची छाननी करून ३,६९१ प्रकरणे बँकेकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविण्यात आली. यातील १ हजार ५५ प्रकरणे मंजूर करण्यात आली. ग्रामीण आणि शहरी प्रगतीमध्ये क्षेत्रनिहाय प्रगतीचा विचार करता, ग्रामीण भागातून ६६९ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे, तर शहरी भागातील ३८६ तरुणांना योजनेचा लाभ मिळाला आहे. ग्रामीण भागात अधिक प्रकरणे मंजूर झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळत आहे.

योजना राबविताना महत्त्वाच्या पैलूवर जिल्हा प्रशासनाने लक्ष केंद्रीत केले. प्रामुख्याने महिला सक्षमीकरणात महिला उद्योजकांवर विशेष भर देण्यात आला. यासाठी एकूण ६३३ महिलांची प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. यातून महिला आणि ग्रामीण युवकांना प्राधान्य देण्यात आले. एक जिल्हा एक उत्पादन उपक्रमात कापड उद्योग क्षेत्रातील ३०६ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात अधिकाधिक कर्जप्रकरणे मंजूर व्हावीत, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रयत्न केले. यात दर महिन्याला बँक व्यवस्थापकांची बैठक घेऊन कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच कर्ज प्रकरणे मंजूर करणाऱ्या बँकांच्या शाखेला भेट देऊन प्रक्रियेविषयी माहिती घेतली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्थानिक उद्योगांना चालना देणे, स्वयंरोजगार निर्मिती, बँकांमार्फत सुलभ कर्ज प्रक्रिया आणि विशेषतः युवक व महिलांना प्राधान्य देणे या चतुःसूत्रीवर भर देण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रभावी नियोजनामुळे जिल्ह्यातील बेरोजगारी कमी होण्यास आणि उद्योजकतेला नवी दिशा देण्यास मदत होत आहे. या मोहिमेत स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा आणि कॅनरा बँक यांनी प्रामुख्याने सक्रिय सहभाग नोंदविला.

## अमरावतीत भरदिवसा घरफोडी : २० लाखांचा मुद्देमाल लंपास

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती -** शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या राजापेठ परिसरात भरदिवसा घरफोडीची खळबळजनक घटना घडली आहे. चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण २० लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. मिळालेल्या माहितीनुसार, घरमालक दुपारी काही कामानिमित्त बाहेर गेले होते. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरु केला आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी गस्त वाढवण्याची मागणी केली जात आहे.

## सव्वालाख हेक्टर क्षेत्राला तडाखा! केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारीचे मोठे नुकसान

### बाधित शेतकऱ्यांना करणार मदत : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई -** राज्यात झालेला वादळी पाऊस आणि गारपिटीमुळे सुमारे १ लाख २२ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे.

या अवकाळी पावसाचा मोठा तडाखा गहू, मका, हरभरा, ज्वारीसह फळपिकांना बसला आहे. शेतकऱ्यांच्या या नुकसानीचे तातडीने पंचनामे पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी दिली.

दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी भोर तालुक्यातील वडगाव डाळ येथे भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. या दौऱ्यादरम्यान त्यांनी गावातील नुकसान झालेल्या आंब्याच्या बागांचे तसेच विविध शेती पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. अवकाळी पावसामुळे आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. फळबागांचे मोठे नुकसान; शेतकरी संकटात

राज्यात केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, कलिंगड, भाजीपाला, डाळिंब, कांदा, संत्रा, द्राक्ष आदी पिकांचे तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक ठिकाणी कांदा कुजला असून पपईची रोपेही खराब झाली आहेत. शेतात पाणी साचल्याने उभी पिके आडवी झाली असून मजुरी आणि खतांचा खर्च वाया गेला आहे.

अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे वेळेत पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये.



वरुड : मतदारांच्या अंतःकरणातुन उमटलेल्या सादला आणि विदर्भ साहित्य संघाचा एक नवा अध्याय रचणाऱ्या विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष तथा वनराईचे विश्वस्त डॉ.गिरीश गांधी यांचे पुष्पगुच्छ देवुन अभिनंदन करतांना डॉ.माधवराव पानसे विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन ठाकरे.

### प्रशासकीय दिरंगाईला कंटाळुन

## ६ एप्रिलला महिला शेतकऱ्याचा आत्मदहनाचा इशारा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड -** वन्यप्राण्यांच्या सततच्या हल्ल्यामुळे उद्ध्वस्त झालेली पिके आणि त्या बदल्यात मिळणारी तुटपुंजी नुकसान भरपाई या दुष्टचक्रात अडकलेल्या टेंभुरखेडा येथील महिला शेतकरी कमला महादेव कडु यांनी कृषी अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार पुर्ण भरपाई मिळावी आणि शेताला सौर कुंपण घालुन मिळावे, या मागणीसाठी येत्या ६ एप्रिल रोजी अमरावतीच्या उपवनरक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा ईशारा दिला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, टेंभुरखेडा येथील गट क्र.९८ मध्ये कमला कडु यांची शेती आहे. २०२३ पासून २०२६ पर्यंत त्यांच्या शेतातील ज्वारी आणि तुरीच्या पिकाचे रान डुक्कर, रोही व अन्य जंगली प्राण्यांनी मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. या नुकसानीबाबत त्यांनी वेळोवेळी वन विभाग आणि कृषी विभागाकडे दाद मागितली परंतु मिळालेली नुकसान भरपाई अत्यंत अल्प असून ती जखमेवर मीठ चोळण्यासारखी असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या प्रकरणी शेतकरी महिलेने १८ जुलै २०२५ रोजी वकिलामार्फत जिल्हाधिकारी, मुख्य वनरक्षक (नागपूर/अमरावती) आणि वनपरिक्षेत्र अधिकारी यांना कायदेशीर नोटीस बजावली होती तसेच २३ मे २०२५ रोजी मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांकडेही दाद मागितली होती परंतु इतका पाठपुरावा करुनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही.

वारंवार विनंत्या केल्या, तक्रारी केल्या, पण प्रशासनाला आमच्या वेदना दिसत नाहीत. शेती व्यवसाय पुर्णपणे तोट्यात आला असून कुटुंबाचा उदरनिर्वाह कठीण झाला आहे जर ६ एप्रिल पर्यंत न्याय मिळाला नाही तर उपवनरक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करण्याशिवाय आमच्याकडे पर्याय उरलेला नाही, असा ईशाराही कमला कडु यांनी दिला आहे.

## गणेश विहार परिसरात निकृष्ट दर्जाची नाली व रस्ता

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### धिरज खोडस्कर यांची मुख्याधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी



**वरुड -** नगर परिषद अंतर्गत वॉर्ड क्र.१० मधील गणेश विहार परिसरात सुरु असलेल्या पाणी टाकी, नाली व रस्ते बांधकामात मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचा आरोप धिरज खोडस्कर यांनी केला आहे.

या संदर्भात युवा सेना राज्य विस्तारक धिरज खोडस्कर यांनी मुख्याधिकाऱ्यांना दलेल्या निवेदनात नमुद केले आहे की, संबंधित कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असुन कामाची गुणवत्ता अत्यंत खालावलेली आहे तसेच रस्ते व नाल्यांचे काम निकृष्ट पद्धतीने करण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

या कामांची तातडीने सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात यावी तसेच संबंधित कामांचे एस.डी.जप्त करण्यात यावे तसेच अमरावती येथील अभियांत्रिकी महा विद्यालयाच्या तज्ञांकडुन थर्ड पार्टी ऑडिट करण्यात यावे.

या प्रकरणाची लवकरात लवकर दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अन्यथा नागरिकांच्या हितासाठी पुढील पाऊले उचलली जातील, असा इशाराही धिरज खोडस्कर यांनी दिला आहे.

## फलटण महिला डॉक्टर मृत्यू प्रकरणात पीएसआय गोपाळ बदनेला जामीन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**कोल्हापूर :-** सातारा जिल्ह्यातील फलटण येथे महिला डॉक्टर आत्महत्येप्रकरणी मागील पाच महिन्यांपासून तुरुंगात असलेला निलंबित पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. यामुळे पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने तुरुंगाबाहेर येणार आहे. फलटण मधील एका हॉटेलच्या रूममध्ये महिला डॉक्टरने गळफास घेऊन स्वतःचा जीवनप्रवास संपवला. या महिला डॉक्टरने मृत्यूपूर्वी स्वतःच्या हातावर पीएसआय गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर या दोघांची नावे लिहिली होती.

## रत्नागिरी पॅसेंजर दादरहून नाहीच : पाचव्या-सहाव्या मार्गिकेनंतर दादरपासून गाडी चालविण्याचा विचार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई :-** दिवा स्थानकातून चालविण्यात येत असलेली रत्नागिरी पॅसेंजर दादर स्थानकातून चालविण्याची मागणी होत आहे.

मात्र या गाडीमुळे सहा ते सात गाड्यांना थांबवावे लागते. यामुळे कुर्ला-परळ दरम्यान पाचवी-सहावी मार्गिका पूर्ण झाल्यानंतर ही गाडी दादर स्थानकातून सोडण्याचा विचार करण्यात येईल, अशी भूमिका मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केली. दादर-रत्नागिरी पॅसेंजर दिवा स्थानकातून चालविण्यात येत असल्याने विविध संघटनांकडून रेल्वे प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत मध्य रेल्वेने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत याबाबत पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केले. यावर उत्तर देताना रेल्वे अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. दादर-रत्नागिरी पॅसेंजर कोरोना नंतर २०२१ मध्ये दादर स्थानकावरून दिवा स्थानकामध्ये शिफ्ट करण्यात आली. या कामासाठी भूसंपादनाचे काम सुरू असून ही मार्गिका पूर्ण होताच रत्नागिरी पॅसेंजर दादर स्थानकातून चालविण्याबाबत विचार करण्यात येईल, असेही नीला यांनी सांगितले.

## देशातील पहिली 'युटीलिटी कॉरिडॉर' गॅस पाईपलाईन टाकण्याच काम पूर्ण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अकोला -** आखाती देशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जगभरात इंधन आणि गॅसची अभूतपूर्व अशी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे सरकारने सध्या पाईप गॅसवर भर दिला आहे.

तसेच त्या दृष्टीने समृद्धी महामार्गाच्या बाजूने समृद्धी महामार्गाच्या बांधकामाच्या वेळीच सरकारने मुंबई ते नागपूर अशी ६९४ किमी लांब नैसर्गिक गॅस वाहून नेणारी पाईपलाईन टाकण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार ही पाईपलाईन टाकण्याचं काम पूर्ण झालं असून या कंपनीने पाईपलाईन टाकण्याचं काम पूर्ण केलं आहे.ही पाईपलाईन देशातील पहिली सर्वात मोठी पाईपलाईन आहे जी महामार्गासोबत 'युटिलिटी कॉरिडॉर' मध्ये बसवली गेली आहे. त्यामुळे फक्त तीन मीटर रुंदीच्या पट्ट्यात ही पाईपलाईन मुंबई ते नागपूर टाकण्यात आली आहे.

युटिलिटी कॉरिडॉरमध्ये पाईपलाईन बसवल्याने कोणते फायदे? - जमीन अधिग्रहण अतिशय कमी झालं. -पाईपलाईन टाकण्यासाठी खर्च कमी झाला -भविष्यातील प्रकल्पांसाठी आदर्श मॉडेल तयार झालं. सुमारे २४ इंच व्यास असलेली ही पाईपलाईन प्रति दिवस १.६५ कोटी इतका गॅस वाहून नेणार आहे.

## माढा तालुक्यातील अंजणगाव खेलोबामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यावरून तणाव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सोलापूर -** जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अंजणगावमध्ये खेलोबामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यावरून मोठा तणाव निर्माण झाला आहे.

आंदोलकांनी ८ ते १० तास रस्ता रोको केल्यामुळे आणि दगडफेक झाल्यामुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले. ग्रामस्थांनी आणि विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी पुतळा हटवण्यास तीव्र विरोध केला आहे. आज (३ एप्रिल) दुसऱ्या दिवशी सुद्धा तणाव कायम आहे. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा सन्मानाने काढावा आणि तो शासनाच्या किंवा ज्यांनी हा पुतळा बसवला आहे त्यांच्या जागेमध्ये उभा करून त्या ठिकाणी शिवसृष्टी करावी अशी मागणी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी केली आहे. प्रशासनाने हा पुतळा सन्मानाने हलवावा असेही हाके यांनी म्हटले आहे. पोलिसांनीच केली महाराजांच्या पुतळ्याची पूजा आज छत्रपती शिवाजी महाराज यांची पुण्यतिथी आहे. पोलीस उप अधीक्षक बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक संजय जगताप आणि इतर पोलिस अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणावर गुलाब पुष्प अर्पण करत अभिवादन केलं. आंदोलकांशी चर्चा करून वाद मिटवण्याचा प्रयत्न दरम्यान, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी काल आंदोलकांशी चर्चा करून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. जमावाकडून दगडफेक झाल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. यामध्ये काही पोलीस आणि आंदोलक जखमी झाले. गावात सध्या मोठ्या प्रमाणावर पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला असून शांतता राखण्याचे आवाहन केले जात आहे.

## मुंबई-गोवा महामार्गावर बस उलटून भीषण अपघात

### ३८ प्रवासी जखमी दोघांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागोठणे :-** मुंबईहून गोव्याला जाणाऱ्या एका खासगी बसचा मुंबई गोवा महामार्गावर अपघात झाला. रायगड जिल्ह्यातील नागोठणे जवळील सुकळी खिंडीत शुक्रवारी पहाटे झालेल्या भीषण बस अपघाताने मुंबई गोवा महामार्गावर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. खाजगी ट्रॅव्हल्स बस पलटी झाल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला असून ३८ प्रवासी जखमी झाले आहेत. यापैकी ८ ते ९ जणांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अपघात इतका गंभीर होता की बस पूर्णपणे उलटून रस्त्याच्या कडेला फेकली गेली. जखमींना तातडीने कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. काही प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्या असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले जात आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बस सुकळी खिंडीतून जात असताना अचानक चालकाचे नियंत्रण सुटले आणि काही क्षणांतच बस पलटी झाली. अपघातानंतर प्रवाशांचा आक्रोश ऐकून स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. पोलिस आणि आपत्कालीन यंत्रणांनीही तत्काळ घटनास्थळी धाव घेत अडकलेल्या प्रवाशांची सुटका केली.

दरम्यान, बसमध्ये तांत्रिक बिघाड होता का, चालकाचा वेग किंवा निष्काळजीपणा कारणीभूत होता का, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत. या अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून प्रशासनाकडून कठोर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## राज्यात ई-वाहनांना चालना : शासनाकडून कोट्यवधींचा निधी वितरीत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई :-** राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवून पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला गती देण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५ अंतर्गत विविध घटकांना प्रोत्साहनपर निधी वितरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

या निर्णयानुसार, ई-वाहनांच्या मागणीला चालना देण्यासाठी उत्पादक कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर अनुदान देण्यात आले आहे. यात बजाज ऑटो लिमिटेड, महिंद्रा इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेड आणि ऑलेर मोटर्स प्रा. लिमिटेड यांना तीन चाकी वाहनांसाठी एकूण २.५१ कोटींहून अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच, राज्यातील प्रमुख शहरी वाहतूक उपक्रमांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. बेस्ट, नागपूर महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका आणि ठाणे महानगरपालिका या सहा उपक्रमांना मिळून ४.५५ कोटींचा निधी देण्यात आला आहे. यामुळे शहरांमध्ये सार्वजनिक ई-वाहतूक अधिक सक्षम होणार आहे. याशिवाय इतर कंपन्यांनादेखील ई-दुचाकी व ई-तीनचाकी वाहनांसाठी एकूण ४.४५ कोटींपेक्षा अधिक प्रोत्साहन रक्कम वितरित करण्यात येणार आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, हा निधी २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ई-वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी २४६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील ई-वाहन क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे मॅडम, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.१०५/२०२६ ने.ता.१०/०४/२०२६**

**अर्जदार :-**
वामन कचरुजी वानखडे
वय अं.६९ वर्ष, धंदा-मजुरी
रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

**गैरअर्जदार :-** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत मनाबाई उर्फ मैनाबाई कचरु वानखडे, रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१०/०४/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २०/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.१०४/२०२६ ने.ता.२७/०४/२०२६**

**अर्जदार :-**
१) गुलाब हैबत तायवाडे, वय अं.७९ वर्ष, धंदा-निरंक
२) रघुनाथ हैबत तायवाडे, वय अं.७१ वर्ष, धंदा- मजुरी
क्र.१ व २ रा.बेसखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

**गैरअर्जदार :-** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत हैबत गवतु उर्फ गवत्या तायवाडे, रा.बेसखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/०४/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २४/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२२६/२०२६ ने.ता.२४/०४/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती कमळ भानुदास माहुलकर, वय अं.८० वर्ष, धंदा-घरकाम, २) जगदीशराव भानुदासपंत माहुलकर वय अं.५७ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ व २ रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती, ३) सौ.साधना रामकृष्णा लाडुकर, वय अं.६१ वर्ष, धंदा- घरकाम, रा.नागपूर, ता.जि.नागपूर

... विरुध्द ...

**गैरअर्जदार :-** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत भानुदास नामदेवराव माहुलकर, रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०४/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ३०/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-३३/२५-२६ दि.१३/०२/२६**

**जाहिरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्री जावेद खान हमीद खान, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **आजोबा नामे-शेख नादर शेख मेहताब, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा मृत्यू दि.१०/०३/१९७१** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी १३/०२/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**




# कपाटातुन १ लाख ६३ हजारांचे दागिने लंपास

## अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल : शिवाजी नगर येथील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड –** शहरातील शिवाजी नगर येथील घरातुन अज्ञात चोरट्याने सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. या प्रकरणी वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्वप्निल रामदास थोटे (३९), रा.वरुड यांच्या घरात अज्ञात चोरटंयाने प्रवेश करुन घरातील लोखंडी अलमारीमध्ये ठेवलेले मंगळसुत्र ३५ ग्रॅम किंमत ९५ हजार रुपये, सोन्याची चैन १३ ग्रॅम किंमत ३० हजार रुपये, सोन्याचे कानातले ७ ग्रॅम किंमत १९ हजार रुपये, सोन्याची अंगठी ७ ग्रॅम किंमत १९ हजार रुपये असा एकुण ६२ ग्रॅम किंमत १ लाख ६३ हजार रुपयाचे सोन्याचे दागिने चोरुन नेल.

या प्रकरणी फिर्यादी स्वप्निल रामदास थोटे (३९), रा.वरुड यांचे तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द भादंवि ३०३ (२) बिएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

# इंडोनेशियात ७.४ तीव्रतेचा भूकंप : एकाचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***जाकार्ता* –** इंडोनेशियाच्या पूर्वेकडील भागाला गुरुवारी सकाळी ७.४ रिश्टर स्केल तीव्रतेच्या शक्तिशाली भूकंपाचा धक्का बसला. त्यामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून उत्तर सुलावेसी प्रांतातील अनेक इमारतींचे नुकसान झाले आहे. या घटनेनंतर अमेरिकेच्या एका संस्थेने भूकंपाच्या केंद्रापासून १ हजार किलोमीटरच्या परिघात धोकादायक त्सुनामी लाटा निर्माण होण्याची शक्यता वर्तवत इशारा जारी केला होता. परंतु कालांतराने हा इशारा मागे घेण्यात आला. नुकसानीचा अंदाज नाही स्थानिक आपत्ती निवारण संस्था आणि इंडोनेशियाच्या शोध आणि बचाव संस्थेने अद्याप अधिकृत नुकसानीचा अंदाज जाहीर केलेला नाही;

हा भूकंप सुला–वेसी आणि मालुकू द्वीपसमूहांच्या दरम्यान असलेल्या 'मोलुक्का समुद्रा'त जमिनीखाली केवळ ३५ किलोमीटरच्या उथळ खोलीवर पहाटेच्या वेळी झालाय.

# किरकोळ वादातुन पत्नीचा पतीवर चाकुने हल्ला

## व्यंकटेश नगर परिसरातील घटना : महिलेविरुध्द गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड –** पती-पत्नीच्या किरकोळ वादातुन पत्नीने आपल्या पतीवर भाजी कापण्याच्या चाकुने हल्ला करुन त्याला जखमी केल्याची घटना नुकतीच शहरातील व्यंकटेश नगर परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी भुपेंद्र प्रभाकर धोटे (३४) आणि आरोपी दीपिका



भुपेंद्र धोटे (३१) दोघेही रा.व्यंकटेश नगर, वरुड हे एकाच घरात राहतात. गेल्या काही काळापासून त्यांच्यात आपापसात पटत नसल्याने ते एकाच घरात वेगळे राहत आहेत. त्यांच्या घटस्फोटाचा खटला सध्या न्यायालयात सुरु आहे. घटनेच्या दिवशी भुपेंद्र हा घरी ब्रश करत असतांना 'तु येथे ब्रश का करत आहेस? असे म्हणत दिपिकाने त्यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. वादाचे रुपांतर शिवीगाळीत झाले आणि संतापलेल्या दिपिकाने घरातील भाजी कापण्याचा चाकु घेऊन भुपेंद्र यांच्या पोटावर वार केला. या हल्ल्यात ते जखमी झाले आहेत.

या प्रकरणी फिर्यादी भुपेंद्र प्रभाकर धोटे (३४), रा.व्यंकटेश नगर, वरुड यांचे तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी आरोपी दीपिका भुपेंद्र धोटे (३१), रा.वरुड यांच्या विरुध्द भादंवि ११८ (१), ३५२, ३५१ (२) बिएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांचे मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने –१,५०,८५३ रु.(१०ग्रॅम)

२२ सोने – १,३८,१८१ रु.(१०ग्रॅम)

चांदी – २,५५,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |
| मका – | २२०० – | २३०० |

# राज्यात अवकाळीचा कहर! साताऱ्यात गारांच्या तडाख्यानं सोलर पॅनल्स फुटले, करच्या काचांना तडे



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***पुणे–*** हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यातील अनेक जिल्ह्यांना विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने अक्षरशः झोडपून काढलं आहे.

या अवकाळी पावसाचा फटका ग्रामीण भागासह शहरी भागांना देखील बसला आहे. तर यावेळी आलेल्या या पावसाने बळीराज्याच्या तोंडचा घास हिरवल्याचे चित्र आहे. ज्यामध्ये कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातील शेतकरी भरडला गेला आहे. अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान केलं आहे. एकीकडे आखतातील युद्धामुळे महागाईचा भडका उडाला असताना आता अस्मानी संकट उभे ठाकले आहे. परिणामी या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून करण्यात आली आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

## अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड –** पायदळ जात असलेल्या एका ४२ वर्षीय व्यक्तीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. हा अपघात गेल्या १९ मार्च रोजी रात्री १० वाजताच्या सुमारा घडला होता. वरुड पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बडगु अमृत जावरे (४२), रा.डॉ.रमेश डफरे यांचे शेतात, वरुड हे जायका हॉटेल जवळुन पायदळ जात होते. यावेळी एका अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवुन




जावरे यांना पाठीमागुन जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, बडगु जावरे हे गंभिररित्या जखमी झाले. अपघात घडल्यानंतर संबंधित वाहन चालक मदतीसाठी न थांबता वाहन घेऊन घटनास्थळावरुन पसार झाला. १० दिवसपर्यंत त्यांना रुग्णालयात उपचार देण्यातआला परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी फिर्यादी टंजित रवि जावरे (२४), रा.कोकट, ता.जुन्नारदेव, जि.छिंदवाडा (म.प्र.), ह.मु.वरुड यांचे तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुध्द भादंवि २८१, १०६ (१) बिएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांचे मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

# अवकाळी पाऊस आणि गारपिटीने तालुका हादरला

## गहु, मका आणि संत्रा पिकांचे अतोनात नुकसान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***वरुड* –** तालुक्याला काल दि.१ ला मध्यरात्रीच्या सुमारास अवकाळी पाऊस व गारपीटीचा तडाखा बसला. जोराचा वारा पाऊस व गारपीटामुळे शेतात उभा असलेला गहू, मका आडवा झाला तर संत्रा मोसंबी सह आदी पिकांचे मोठे नुकसान झाले. या आपदेणे शेतकरी चिंताग्रस्त झाला असून शासनाने सर्वेक्षण करुन मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी करु लागले आहे.

तालुक्यातील घोराड, आमनेर, देऊतवाडा, उदापूर, नायगाव या परिसरात जोराचा वारा अवकाळी पाऊस व गारपिटीचा



तडखा बसला. या नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. काल दि.१ ला मध्यरात्रीच्या सुमारास विजाच्या कडकडाटासह जोराचा वारा सुटला. जोराचा पाऊस सुरु होताच गारपीटीला सुरुवात झाली. या परिसरातील काही भागात बोराच्या आकाराची गार झाल्याने शेतात उभा असलेल्या शेतमालाचे मोठे नुकसान झाले.

वादळी वाऱ्यामुळे कापणीसाठी आलेला गहू, मका लोटला तसेच संत्रा झाडांवर असलेल्या संत्रा मोसंबीची फळे गळुन पडली. या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून शासनने पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

